# **रे.मु.नं.२४/२०१५ मधील नि.क्र.३० वर आदेश:-**

***पुंडलिक लक्ष्मण कांबरी व इतर ... वादी***
***वि.***
***दामु कानु कांबरी व इतर ... प्रतिवादी***

१) सदरचा अर्ज वादीने, दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

२) अर्जात वादीचे कथन की, दावा हा वाटपकाकरिता व मनाई हुकुमाकरिता दाखल केला आहे. दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१८ चे नाव दिनेश मोहन कांबरी असे लिहिण्यात आले आहे. प्रतिवादी क्र.१८ चे नाव दिनेश नसुन हितेश मोहन कांबरी असे आहे त्यामुळे मुळ दाव्यात दुरूस्ती करणे गरजेचे झाले आहे. सदर दुरूस्तीमुळे दाव्याचे स्वरूपात बदल होणार नाही, त्यामुळे दुरूस्तीची परावानगी मिळावी.

३) सदरचा अर्ज दिनांक २७/०४/२०१५ रोजी दाखल करण्यात आला आहे पण आजतागायत प्रतिवादींनी म्हणणे दिले नाही त्यामुळे प्रतिवादीचे म्हणणे नाही असा आदेश करण्यात आला. वादीने कथनाचे पृष्ठयर्थ निशाणी क्र.३१ वर प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

४) वादीने कथन केल्याप्रमाणे ते करू पाहत असलेली दुरूस्ती केवळ तांत्रिक स्वरूपाची असल्याने दाव्याचे स्वरूपात बदल होणार नाही त्यामुळे वादींना दुरूस्ती करण्यास परवागी देण्यास कोणतीही हरकत नाही. पण वादीनी दावा दाखल करतेवेळी योग्य ती काळजी घेणे गरजेचे होते त्यामुळे वादी खर्चास पात्र राहतील. कारणे आदेश.

## **::आदेश::**

१. अर्ज रक्कम रू.२०० च्या खर्चासह मंजूर करणेंत येत आहे.

२. वादींनी खर्चाची रक्कम भरून दाव्यामध्ये विहीत मुदतीत दुरुस्ती करून प्रतिवादी क्र.१८ चे नावात बदल करावा.

कर्जत
दि.२४/०३/२०१७

**(शु.भि.यादव)**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कर्जत.